# पाश्चात्य प्रभावामुळे भारतीय संगीत बदलणार नाही - अशोक रानडे

लोकसत्ता
2.12.96

**प्रतिनिधी**

पुणे, १ डिसेंबर

नवी माध्यमे वा पाश्चात्य संगीताच्या प्रभावामुळे नव्हे, तर भारतीय संगीतकार ठरवतील तेव्हाच भारतीय संगीत बदलेल. संगीत स्वीकारण्याचा निर्णय संस्कृती घेत असते, असा विचार भारतीय संगीत, संस्कृती व नाट्य क्षेत्रातील गाढे अभ्यासक डॉ. अशोक दा. रानडे यांनी येथे व्यक्त केला.

'संगीतचार्य अशोक दा. रानडे षष्ट्यब्दिपूर्ती सत्कार समिती'च्या वतीने आयोजित कार्यक्रमात कथकनृत्य कलाकार रोहिणी भाटे यांच्या हस्ते डॉ. रानडे यांचा सत्कार करण्यात आला. जुन्या पिढीतील ज्येष्ठ अभिनेत्री गायिका ज्योत्स्ना भोळे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमानंतर 'संस्कृती व कला' या विषयावर मुक्त चर्चा आयोजित करण्यात आली होता. त्या वेळी संगीतसमीक्षक डॉ. श्रीरंग संगोराम, दत्ता मारुलकर, नाटककार डॉ. सतीश आळेकर आणि पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संस्थापन विभागातील व्याख्याते प्रसन्नकुमार अकलुजकर यांच्या प्रश्नांना डॉ. रानडे यांनी उत्तरे दिली. समितीतर्फे नरेंद्र डेंगळे यांनी सूत्रसंचालन केले.

पक्षी-प्राण्यांचे आवाजाचे संगीत यासह सर्वच बदलांना आपण उन्मुख व्हायला हवे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. ■



ज्ञानेश्वर नाडकर्णी

# अशोक दामोदर रानडे

आमचे विद्वान संगीतज्ञ मित्र डॉ. अशोक दामोदर रानडे यांच्या वयाला अलीकडेच साठ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने पुण्यात आज त्यांच्या अनुयायांची एक मैफल झाली.

कोणे एके काळी अशोक रानडे बनाम हॉल लेनमधल्या 'समर्थ सदना'त पहिल्या मजल्यावर राहत. मुंबई नभोवाणीवर नोकरी करून ते शिकले आणि दोन वेगवेगळ्या विषयांतील एम. ए. त्यांनी संपादन केली.

त्यांच्याच मजल्यावर सुप्रसिद्ध नाटककार व कवी सदाशिव अनंत शुक्ल यांचे बिऱ्हाड होते. शुक्लांची - माझी मैत्री जमली होती. अधूनमधून मी त्यांच्याकडे जात असे. मी येताच ते एक ज्योतिषशास्त्रावरचे जाडजूड पुस्तक काढीत आणि त्यातील सनावळ्या चाळीत माझे भविष्य सांगत!

शुक्ल म्हणत, ''माझ्या नाटकात ज्यानं काम केलेलं आहे त्याचं नेहमीच मलं झालं आहे!'' चिकित्सक समूह शाळेत इंग्रजी तिसरीच्या वर्गात असताना वार्षिक संमेलनात आम्ही शुक्लांचे 'सिंहाचा छावा' हे नाटक बसविले होते. त्यात मी अर्जुन झालो होतो. 'हा पाहा माझ्या गांडीव धनुष्याचा टणत्कार!'' असे मी म्हटले की विंगेतून आमचे मास्तर डग्यावर थाप मारून 'टणत्कारा'चा आवाज काढीत!

शुक्लांकडची भेट झाल्यावर मी जिन्यालगतच्या रानड्यांच्या बिऱ्हाडात जाई. हातात तंबोरा घेऊन त्यांचा रियाज चाललेला असे. त्यांच्यासमोर बसून तो मी ऐकत असे.

रानड्यांना गानकलेचे वरदान त्यांच्या आजोळच्या मंडळीकडून मिळालेले असावे. ग्वाल्हेर घराण्याचे बुजुर्ग गायक पं. लक्ष्मणराव बोडस हे त्यांचे मामा. सुप्रसिद्ध गायक नट नारायण बोडस आणि विख्यात गायिका सौ. वीणा सहस्रबुद्धे हे चुलतमावस नात्यातले.

रानड्यांचा भरदार आवाज ग्वाल्हेर गायकीशी नाते सांगतो, परंतु आजवर त्यांनी कसोशीने वेगवेगळ्या शैलींचा संचय केलेला आहे. विशेष म्हणजे ते नुसतेच गायक राहिले नाहीत. संगीतकार किंवा संगीतदिग्दर्शक म्हणून त्यांनी केलेली कामगिरी फार मोठी आहे.

रानड्यांच्या मातोश्रींची आणि आमच्या 'हिची' ओळख इंडियन नॅशनल थिएटरने पंढरपूरला आयोजित केलेल्या भक्तिसंगीत उत्सवात झाली. सोज्ज्वळ, सुसंस्कृत अशा खानदानाचे त्या उत्तम उदाहरण. कर्मधर्मसंयोगाने रानड्यांना बायकोही अशीच मिळाली. रानड्यांचे मित्र हे आपलेच मित्र अशा पद्धतीने हेमांगिनी त्यांच्याशी वागते. या दोघांची गाठ मुंबई नभोवाणीत पडली. धर्म, रूढी इ.ची बंधने त्यांच्या आड कधीच आली नाहीत. संकटांना त्यांनी वाऱ्यात तरंगणाऱ्या पिसांइतके हलके मानले.

माझी पत्नी आमच्या घराजवळच्या गावदेवीवरील श्रीमती इंदिरा गोखले यांच्या विद्यालयात गाणे शिकायला जायची. इंदिराबाई आणि रानड्यांची आई यांच्यात जवळचे नाते होते. श्रीमती गोखले सांगायच्या की, अशोक लहान असताना आईबरोबर विद्यालयात यायचा. त्याला नेहमीच पुढारीपण हवे असे! आगिनगाडी खेळायची असेल तर भोवतालच्या मुलांना तो सांगायचा, 'मी इंजिन होणार! तुम्ही सगळे डबे!' ज्या पद्धतीने रानड्यांनी नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टसमध्ये काम केले, ज्या थाटात त्यांनी अनेक सांगीतिक कार्यक्रमांचे पु. ल. देशपांड्यांच्या बरोबरीने संयोजन केले त्यात हाच लहानपणीचा दरारा दिसत नाही काय? रानडे आपल्या उभ्या कारकीर्दीत इंजिन ड्रायव्हरच राहिले!

याहीपेक्षा जास्त मजा त्यांच्या एका लेखात आहे. ते विलायतेला गेले होते, आणि तेथील त्यांची संस्मरणे 'सत्यकथे'त प्रसिद्ध झाली होती. त्यातील एक प्रसंग असा की, वसतिगृहात सकाळचे उठून रानडे जमिनीवर ओव्हरकोट पसरतात आणि मग त्यावर शीर्षासन व अन्य योगासने करतात!! आहे की नाही परकीयांची भूमी पादाक्रांत करणारा हा निग्रही वीर?

समर्थ सदनातील रानड्यांच्या बिऱ्हाडात गेल्यावर कधीमधी वेलची केळी माझ्यासमोर येत. रियाजात गुंतलेले रानडे याबाबत तटस्थ असत. किंबहुना आपल्या स्वतःच्या आयुष्याबाबत त्यांनी एक करडी शिस्त अंगात बाणवलेली होती.

पु. लं.नी नॅशनल सेंटरची कारकीर्द गाजविल्यावर विजया मेहता या त्या संस्थेच्या संचालिका झाल्या. तत्क्षणी रानड्यांनी आपल्या पूर्वीच्या उपसंचालकपदाचा राजीनामा दिला. विजयाबाईंच्या कारकीर्दीत त्यानंतरच्या काळात अशा काही घटना घडल्या की रानडे संस्थेतून बाहेर पडले हेच बरे झाले असे वाटते. जणू त्याना आगामी गोंधळाची पूर्वसूचनाच मिळालेली असावी!

परंतु त्यानंतरच्या काळात ते जास्तच कसोशीने आपले संशोधनाचे आणि लिखानाचे काम करू लागले. त्यांच्या क्षेत्रात एक व्यासंगी लेखक म्हणून त्यांना मराठीइतकाच इंग्रजीत मान आहे. विजया - रानडे प्रकरणातील मख्खी अशी की, संस्थेचे विश्वस्त डॉ. जमशेद भाभा यांच्या लेखी विजयाबाईंना जो 'ग्लॅमर' आहे तो रानड्यांना नाही. 'टाइम्स'चे संपादक शामलाल यांना आपला प्रमुख वार्ताहर ओळखता येत नसे, तसेच इथे आहे!! एकूण रानड्यांचा नैतिक विजय झाला तेव्हा नॅशनल सेंटरची कीर्ती ढगाळली! रानड्यांकडे सतत इंजिन राहिले अन् नॅशनल सेंटरचे डबे रुळांवरून घसरू लागले.

# कधी सूरासमा सुहृद भेटलो

डॉ. अशोक रानडे यांच्या साठीनिमित्त त्यांच्या शिष्यवर्गातर्फे आज सकाळी दादर माटुंगा कल्चरल सेंटर येथे त्यांचा सत्कार सोहळा व सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त त्यांचे मनोगत व्यक्त करणारा हा लेख...

वृत्तमानस, ४/१/२००८

साल : १९७७, स्थळ : दादर येथील छबिलदास मुलांच्या शाळेचा हॉल. प्रसंग : माझे गुरू पं. वसंतराव कुलकर्णी यांचा साठीनिमित्त सत्कार. अनेक गवयांची गाणी झाली. त्यात पं. गजाननराव जोशी यांचंही गाणं झालं. सायंकाळची वेळ. बुवांनी 'श्री' रागातील 'गजरवा बाजे' ही बंदिश तिलवाडचात सुरू केली. मैफल उत्तरोत्तर बुवांच्या गाण्याने व अप्रतिम साथीने रंगत गेली. साथीदार तरी कोण? हार्मोनियमवर मुलुंडचे पेंढारकर, तबल्यावर पं. भाई गायतोंडे, तर तानपुऱ्यावर पं. यशवंतबुवा जोशी व डॉ. अशोक रानडे. डॉ. रानडे यांची व माझी ही पहिली भेट, तब्बल वीस वर्षापूर्वीची. त्यावेळीही डॉ. रानडे मुंबईतील गायनाचार्य, विद्वान मंडळीत गणले जात. तेव्हा असा साथीदार तानपुऱ्यावर बसला तर त्यावरून गजाननबुवांची योग्यता किती मोठी होती, हे जरी कळून चुकलं तरी त्यापेक्षाही गुरूपुढे लीन होऊन त्यांना तानपुऱ्यावर साथ करण्यास बसणाऱ्या डॉ. रानडे यांची विनयशीलता प्रकर्षाने दिसून आली.

पं. वसंतराव कुलकर्णी यांच्या साठीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात ज्या डॉ. रानडे यांना मी प्रथम पाहिले, त्याच डॉ. रानडेंवर नव्हे सरांवर मुलाखतवजा लेख लिहिण्याचा प्रपंच करीत आहे


**योगेश जोशी**

अन् तोही त्यांच्या साठीनिमित्त हा केवळ योगायोगच. आज त्या सरांचा दादर माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये सत्कार होत आहे तोही त्यांच्या शिष्यांच्या पुढाकाराने व गायनाने. आणखी एक योगायोगाचा भाग म्हणजे ४ जानेवारी हा वसंतरावांचा जन्मदिवस.

'मी नवीन काही सांगत आहे, असा दावा कधीही केला नाही. परंपरेत आहे तेच लोकांपर्यंत पोहोचवतो,' सर बोलू लागले. 'मी वयाच्या दहाव्या वर्षी पं. गजाननराव जोशी यांच्याकडे गाणे शिकण्यास सुरुवात केली. घरात गाण्यास पोषक वातावरण. आजोबा कीर्तनकार व वैद्य. वडिलांना गाण्याची आवड. गिरगावात राहत होतो आम्ही. गजाननबुवा केवळ भूर्जिखाँसाहेबांकडे गाणं शिकण्याकरता पुण्यातील घरसंसारासकट कोल्हापूरला स्थलांतरित झाले. पदरात सहा मुले. तेव्हा चरितार्थाकरता १५ दिवस मुंबईत येऊन गाण्याच्या शिकवण्या करत, तर उरलेले १५ दिवस कोल्हापूरला स्वत: खाँसाहेबांकडे गाणं शिकत. बुवांचे मुंबईतील वास्तव्य आमच्या घरी असे; सकाळचा रियाजही ते तेथेच करीत. त्यामुळे कानावर चांगलं गाणं पडे. आपल्या मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजास कीर्तन, गायन, व्याख्यान, नाटक या चार गोष्टींची मनस्वी आवड. गिरगावात या चारही गोष्टी सहजपणे ऐकण्यास, बघण्यास मिळत. काही कळो वा न कळो गायन, कीर्तन जाऊन ऐकणे व परतणे. त्यामुळे संस्कार चांगले होत.'

गजानन बुवांकडे सरांचे शिक्षण होत असतानाच पुढे पं. लक्ष्मणराव बोडस (ग्वाल्हेर घराणे), पं. प्रल्हाद गानू (आग्रा घराणे), प्रोफेसर बी. आर. देवधर (ग्वाल्हेर, पतियाळा घराणे) यांच्याकडूनही त्यांनी तालिम घेतली. 'काही गुरू केलेले असतात तर काही मानलेले असतात, दोन्ही महत्त्वाचे, दोघांचेही ऋण मान्य केलेच पाहिजे.' सरांचं प्रांजळ मत. काही वेळा एखाद्या गायकाची गायकी आवडत असूनही शिष्यत्व पत्करता येत नाही. याला कारणेही अनेक असतील. पूर्वी एका घराण्याची गायकी गाणाऱ्यास दुसऱ्या घराण्याचे गुरू आपला शिष्य करून घेण्यास तयार होत नसत. आपल्या शिष्याने केवळ आपली व आपल्या घराण्याचीच गायकी गावी हा अट्टाहास प्रत्येक गुरूंचा असे. 'कट्यार काळजात घुसली' या नाटकाद्वारे दारव्हेकर मास्तरांनी हीच गोष्ट रसिकांच्या निदर्शनास आणून दिली. मग अशा मानलेल्या गुरूंची गायकी कधीतरी मैफलीत प्रगट होते. स्वत: गजानन बुवा मैफलीत गात असताना मध्येच 'हे राजाभैय्या', 'हे अल्लादियाँखाँसाहेब' असं सांगत व त्यांची गायकी गाऊन दाखवत.

'हो, त्यांच्यासारखं गाणं म्हणजे त्यांची नक्कल करणं नव्हे तर त्यांचं ऋण मान्य करणं असं मला वाटतं' सर पुढे बोलू लागले. 'मला मात्र सुदैवाने एकाही गुरूने बंधनात ठेवले नाही. कारण माझ्या चारही गुरूंना एकमेकाविषयी आदर होता. माझ्या गुरूंनी मला 'थेरम' शिकविले, 'रायडर' नव्हे. 'थेरम' शिकवतात ते गुरू. त्यांनी मला विचार करण्यास प्रवृत्त केलं. गजाननबुवा हे माझे पहिले गुरू. त्यांनी पाया पक्का केला. बोडसांनी गायनात सुसंगती म्हणजे काय, हे दाखवले.' वानगीदाखल सरांनी एका बंदिशीचा मुखडा गाऊन दाखवला. मध्य सप्तकात षड्ज, ऋषभावरूनच तान घेऊन समेवर येताना उगाचच तार सप्तकातला एखादा सूर लावणं म्हणजे थोडक्यात एकदम कुत्र्यासारखं केकाटणं हे गायनात विसंगती निर्माण करते. भले मग ते रागनियमाला धरून असेल तरीही. 'या उलट गजाननबुवा म्हणायचे बंदिशी जमवा आणि बंदिश ज्याप्रमाणे असेल त्याप्रमाणे गा मग ते रागनियमाला धरून नसेल तरीही चालेल. संगीताची नजर हे गजाननबुवांचं देणं. पं. गानूकडून मला अप्रचलीत रागरागिण्या मिळाल्या तर देवधर मास्तरांकडून गाण्यातला नखरा म्हणजे काय, ते कळले. मास्तरांकडून निवडक बंदिशी मिळाल्या तरीसुद्धा त्या तीनएकशे असतील.



● डॉ. अशोक रानडे (छाया : संजय पेठे)

तरीही मास्तर वारंवार म्हणत तुला अजून ५०/६० बंदिशी द्यायच्या आहेत. एखादा राग किंवा बंदिश लपवून ठेवणं हा मास्तरांचा स्थायीभाव नव्हता. ज्यांना जे हवं ते दिलं.' सर बोलले. खरोखर असे गुरू लाभणेही महत्त्वाचे. कारण काही गुरू आपल्या शिष्यांना सर्व राग, बंदिशी दिल्या तर आपलं काय होईल? या भीतीने काही बंदिशी, राग शिकवायचे नाहीत तर काही बंदिशींच्या अस्थाई शिकवायचे पण अंतरे नाहीत, अशी उदाहरणे देता येतील.

'मी मात्र या बाबतीत नशिबवान आहे. माझे चारही गुरू बंदिशींचा खजिना घेऊन बसलेले होते. त्यामुळे त्यांनी मला कधीही हातचं राखून शिकवलं नाही,' सर म्हणाले. देवधर मास्तर हे व्हॉईस कल्चरमध्ये जाणकार होते. त्याविषयी विचारले असता सर म्हणाले, 'आवाजाचा उपयोग बोलणं व गाणं याकरता होतो. आपण ज्या आवाजात बोलतो त्याच आवाजात गातो का? खरं तर बोलण्याचा व गाण्याचा आवाज एकच असला पाहिजे. पण तसे होत नाही. देवधर मास्तरांनी व्हॉईस कल्चरवर खूप अभ्यास केल्याचे मला माहीत होते. १९६९ मध्ये मी त्यांच्याकडे जेव्हा व्हॉईस कल्चरचं अध्ययन करण्याकरता गेलो तेव्हा मास्तर म्हणाले, गेल्या २० वर्षात तू पहिलाच आलास हा विषय जाणून घेण्याकरता. सुरुवातीस मास्तरांची व्हॉईस कल्चरवरून टिंगल केली गेली पण उस्ताद बडे गुलाम अली व उस्ताद अमीरखाँ यांनी त्यांची प्रशंसा केली. पुढे मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात व्हॉईस कल्चरच्या समवेत इतर कोणते नवे विषय शिकवता येतील याचा मी विचार केला, मास्तरांचा सल्ला घेतला व त्याप्रमाणे अभ्यासक्रम आखला.' एरवी साध्या आवाजात बोलणारे काही गायक, खाँसाहेबी थाटात रेकून गाऊ लागले की व्हॉईस कल्चरचे महत्त्व कळते. खरं तर आपल्याकडे शिक्षकीपेशा स्वीकारणाऱ्या समस्त स्त्री-पुरुषांना बी.एड्.च्या अभ्यासक्रमात नरडचावर ताण न देता कसे बोलावे, आवाजाचा वापर, सदुपयोग कसा करावा, याकरता व्हॉईस कल्चर शिकवणे महत्त्वाचे वाटते पण तसे शिकवले जाते का? डॉ. रानडे यांच्यासारखी माणसं हाताच्या बोटावर मोजण्यासारखी असताना त्यांचा सदुपयोग करून घ्यावा असं कुठल्याच बी.एड्. कॉलेजला का वाटत नाही?

सरांनी मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागाच्या प्रमुखपदी असताना अनेक प्रकारचे संगीत गोळा केले. मधमाशी जशी फुलाफुलांवर बसून परागकणातील मध गोळा करते अगदी तसेच हे मधुकण त्यांनी गोळा केले. फरक एवढाच की हे मधुकणच प्रत्यक्ष सरांजवळ येत. मग कधी विठाबाई नारायणगावकर तर कधी यमुनाबाई, कधी कुणी शाहीर, पोवाडे बहाद्दर तर कधी विंदा, हरिवंशराय. एकदा तर स्वत: दुर्गाबाई भागवत सोनी नामक लोकगीत गाणाऱ्या बाईला सरांकडे घेऊन आल्या आणि तिचं गाणं रेकॉर्ड करत असता स्वत:ही गायल्या. परंतु एवढा सारा खजिना असताना आपण केवळ राग संगीतच का गाता? असं विचारलं असता सर उत्तरले, 'राग संगीतात स्वतंत्र विचार मांडता येतो, त्याचा विस्तार करता येतो. जो सांगीतिक कल्पना वाढवतो तो गायक. पठण परंपरेत स्वत:च्या विचारांना महत्त्व नाही, ते दाखवता अथवा वाढवताही येत नाही. तसं झालं असतं तर एखादा शाहीर पोवाडचात ताना घेऊन गायला असता पण तसं होत नाही. ते केवळ रागसंगीतातच होत. अर्थात केवळ राग किंवा शास्त्रीय संगीत म्हणजे भारतीय संगीत नव्हे. शास्त्रीय संगीत हा संगीत परंपरेचा एक भाग आहे एवढंच. आणि ही संगीताची सीमारेषा जो पार करतो तोच महान गायक होतो. कुमारांनी धून उगमाद्वारे काय केले? पलुस्करांनी शास्त्रीय संगीत गाता गाता भजन म्हणायला का सुरुवात केली, टप्पा पंजाबातच का गायला गेला, पंजाबच्या भौगोलिक सीमारेषा पार करून तो बंगालात गेला तेव्हा त्याचे स्वरूप, भाषा तीच राहिली का, ही सर्व नवनिर्मिती होय. आपल्या सामाजिक स्तरांचं संगीत सोडल्याशिवाय नव निर्मिती होऊ शकत नाही. अमीर खुस्त्रो, होनाजीबुवा, निधूबाबू, राम जोशी यांचा अभ्यास केल्यास ही गोष्ट आपल्या सहज ध्यानात येईल.'

मराठी माणसाचं नाट्यसंगीताचं पान बालगंधर्व व मास्तर दीनानाथांशिवाय हलत नाही. पण सरांनी ही सीमारेषा पार करून म्हणजे या दोघांनाही वगळून नाट्यसंगीताचा कार्यक्रम केला अन् तोही गोवा कला अकादमीत. कार्यक्रमापूर्वी लोकांनी नाक मुरडली पण प्रत्यक्षात ऐकल्यावर मात्र वाहवा केली. कुमारांनी जशी रागसंगीताची

महत्त्व कळते. खरं तर आपल्याकडे शिक्षकीपेशा स्वीकारणाऱ्या समस्त स्त्री-पुरुषांना बी.एड्.च्या अभ्यासक्रमात नरड्यावर ताण न देता कसे बोलावे, आवाजाचा वापर, सदुपयोग कसा करावा, याकरता व्हॉईस कल्चर शिकवणे महत्त्वाचे वाटते पण तसे शिकवले जाते का? डॉ. रानडे यांच्यासारखी माणसं हाताच्या बोटावर मोजण्यासारखी असताना त्यांचा सदुपयोग करून घ्यावा असं कुठल्याच बी.एड्. कॉलेजला का

# …सागमा
# …टलो

**डॉ.** अशोक रानडे यांच्या साठीनिमित्त त्यांच्या शिष्यवर्गातर्फे आज सकाळी दादर माटुंगा कल्चरल सेंटर येथे त्यांचा सत्कार सोहळा व सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त त्यांचे मनोगत व्यक्त करणारा हा लेख...

वृत्तमानस, ४/७/२००८

वाटत नाही?

सरांनी मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागाच्या प्रमुखपदी असताना अनेक प्रकारचे संगीत गोळा केले. मधमाशी जशी फुलाफुलांवर बसून परागकणातील मध गोळा करते अगदी तसेच हे मधुकण त्यांनी गोळा केले. फरक एवढाच की हे मधुकणच प्रत्यक्ष सरांजवळ येत. मग कधी विठाबाई नारायणगावकर तर कधी यमुनाबाई, कधी कुणी शाहीर, पोवाडे बहाद्दर तर कधी विंदा, हरिवंशराय. एकदा तर स्वत: दुर्गाबाई भागवत सोनी नामक लोकगीत गाणाऱ्या बाईला सरांकडे घेऊन आल्या आणि तिचं गाणं रेकॉर्ड करत असता स्वत:ही गायल्या. परंतु एवढा सारा खजिना असताना आपण केवळ राग संगीतच का गाता? असं विचारलं असता सर उत्तरले, 'राग संगीतात स्वतंत्र विचार मांडता येतो, त्याचा विस्तार करता येतो. जो सांगीतिक कल्पना वाढवतो तो गायक. पठण परंपरेत स्वत:च्या विचारांना महत्त्व नाही, ते दाखवता अथवा वाढवताही येत नाही. तसं झालं असतं तर एखादा शाहीर पोवाड्यात ताना घेऊन गायला असता पण तसं होत नाही. ते केवळ रागसंगीतातच होत. अर्थात केवळ राग किंवा शास्त्रीय संगीत म्हणजे भारतीय संगीत नव्हे. शास्त्रीय संगीत हा संगीत परंपरेचा एक भाग आहे एवढंच. आणि ही संगीताची सीमारेषा जो पार करतो तोच महान गायक होतो. कुमारांनी धून उगमाद्वारे काय केले? पलुस्करांनी शास्त्रीय संगीत गाता गाता भजन म्हणायला का सुरुवात केली, टप्पा पंजाबातच का गायला गेला, पंजाबच्या भौगोलिक सीमारेषा पार करून तो बंगालात गेला तेव्हा त्याचे स्वरूप, भाषा तीच राहिली का, ही सर्व नवनिर्मिती होय. आपल्या सामाजिक स्तरांचं संगीत सोडल्याशिवाय नव निर्मिती होऊ शकत नाही. अमीर खुस्त्रो, होनाजीबुवा, निधूबाबू, राम जोशी यांचा अभ्यास केल्यास ही गोष्ट आपल्या सहज ध्यानात येईल.'

मराठी माणसाचं नाट्यसंगीताचं पान बालगंधर्व व मास्तर दीनानाथांशिवाय हलत नाही. पण सरांनी ही सीमारेषा पार करून म्हणजे या दोघांनाही वगळून नाट्यसंगीताचा कार्यक्रम केला अन् तोही गोवा कला अकादमीत. कार्यक्रमापूर्वी लोकांनी नाक मुरडली पण प्रत्यक्षात ऐकल्यावर मात्र वाहवा केली. कुमारांनी जशी रागसंगीताची सीमारेषा पार केली तशीच माझे गुरू पं. जितेंद्र अभिषेकी यांनी नाट्यसंगीतात नवनवे प्रयोग करून नवे राग, ताल आणून त्याचे स्वरूप बदलले. मत्स्यगंधा नाटकाचे प्रयोग सुरू झाल्यावर नाट्यसंगीत हे भावगीत केल्याचे आरोप केले गेले. परंतु त्यांनाही पारंपरिकतेच्या बेड्या तोडल्या म्हणूनच नवनिर्मिती होऊ शकली ही गोष्ट नमूद करावीशी वाटते.

साहित्य व संगीत याद्वारे संस्कृतीपर्यंत पोहोचायचं हा एकच ध्यास उराशी बाळगणाऱ्या सरांना जिथे जिथे यात अडथळा आला ते ते ठिकाण सरळ सोडून सर बाहेर पडले. म्हणूनच की काय, गेल्या ४० वर्षांत मंत्रालय, आकाशवाणी, सिद्धार्थ महाविद्यालय, मुंबई विद्यापीठ, अमेरिकन सेंटर, एन.सी.पी.ए., यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अशा अनेक ठिकाणी त्यांनी नोकऱ्या केल्या पण नवनिर्मितीचा ध्यास कायम ठेवला. 'संगीताचे सौंदर्यशास्त्र', 'लोकसंगीतशास्त्र', 'स्ट्राव्हिन्स्कीचे सांगीतिक सौंदर्यशास्त्र', 'मराठी नाट्यसंगीत', 'भाषणरंग व्यासपीठ आणि रंगपीठ' अशी अनेक पुस्तके यातूनच जन्माला आली. 'सोनारबांगला', 'माता द्रौपदी', 'देवाजीने करुणा केली,' 'संध्याछाया', 'एक झुंज वाऱ्याशी', 'काळा वझीर, पांढरा राजा', "Tempt me not', 'राहिले दूर घर माझे' इ. नाटकांचं संगीत, 'एक झुंज वाऱ्याशी' या नाटकाकरता त्यांना संगीत दिग्दर्शनाचे पारितोषिकही मिळाले. 'सावन', 'बैठकीची लावणी', 'देवगाणी', 'संगीतरंग', 'स्वरचक्र', 'रंगबसंत', 'त्रिभंग ते अभंग', 'राधा' अशा एक विशिष्ट सूत्र किंवा कल्पना घेऊन त्याचा आविष्कार करणाऱ्या कार्यक्रमांची संकल्पना, सूत्रसंचालन, संगीत दिग्दर्शन केले. Voice Culture, Appreciation of Hindustani Classical music, भारतीय शास्त्रीय संगीताचा इतिहास, हिंदुस्थानी संगीतातील सौंदर्य, लोकसंगीत इ. विषयांवर प्रात्यक्षिकांसहीत व्याख्यानं देशविदेशात दिली. एवढं करूनसुद्धा अजूनही काही नवीन करण्यासाठी हा जन्म अपुरा पडला तर चक्क पुनर्जन्म घ्यायची व त्या जन्मात नव्या उमेदीने नवनिर्मिती करण्याची प्रबळ इच्छा सर बोलून दाखवतात.

'अर्थात वरील सर्व कार्यक्रम नवीन कलाकारांना घेऊनच केले आणि यापुढेही करणार. कारण आवाजाच्या जातीमधून जे व्यक्त होतं तेच गायचं व तेवढंच मी नवीन कलाकारांकडून गाऊन घेतो. संगीताचे स्वरूप वेगवेगळे आहे. ते शिकवताना वेगळं, बैठकीत गाताना वेगळं,' सर म्हणाले. म्हणूनच की काय परंतु जे उत्तम गुरू असतात ते बैठकीचे उत्तम गायक होतातच असे नाही. कारण रंजकता व विद्वत्ता या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सरांच्या नवनिर्मितीची आस आजही कमी झालेली नाही. प्रतिभेचं पात्र अजूनही विशाल आहे. अजूनही दोन कार्यक्रम त्यांना रसिकांसमोर पेश करायचे आहेत. त्यातील पहिला म्हणजे जयदेवांच्या गीतांपासून १८५० पर्यंतच्या गीतांवरचा तर दुसरा रामायणावरचा. सध्याच्या गोंगाटमय संगीताविषयी विचारले असता सर म्हणाले, 'हे संगीत म्हणजे आदिम संगीत होय व ते सुधारण्याची प्रक्रिया चालू आहे.' सरांचा आशावाद निष्फळ ठरणार नाही. गेली ५० वर्षे आपल्या अभ्यासू, संशोधक, चिकित्सक वृत्तीने एकाहून एक सरस, सुंदर, सुरेलशा कार्यक्रमांची रसिकांना मेजवानी देण्यातच धन्यता मानणाऱ्या सरांकडे पाहिलं की म्हणावंसं वाटतं-

*'कधी सूरामय सुहृद भेटले*
*बेसूर अवघे दूर सारले*
*सात स्वरांची पूजा बांधली*
*सरले जीवन गाता*
*तृप्त मनाने गातो*
*लाख स्मृतींची गाथा...'*

■

***(लेखकाचा पत्ता : ए/३/१ टाटा कॉलनी, लल्लुभाई पार्क रोड, अंधेरी (प.), मुंबई - ५८. दूरध्वनी : ६२३८७३४)***

बुधवार, ७ जानेवारी १९९८

# डॉ. अशोक रानडे यांचा सुरेल षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभ

डॉ अशोक रानडे हे चतुरस्र व्यक्तिमत्त्व आहे. संगीत, नाटक, साहित्य आणि सौंदर्यशास्त्र या चार क्षेत्रात डॉ. रानडे यांच्या वाणीचा आणि लेखणीचा मुक्त संचार झाला आहे आणि होत असतो. मराठी आणि इंग्रजी भाषेत या विषयांशी संबंधित असे मूलभूत स्वरूपाचे लेखन त्यांनी केले आहे आणि त्यांच्या लेखनामुळे संशोधनाच्या नवीन वाटा खुल्या झाल्या आहेत. भारतीय संगीताची परंपरा किती समृद्ध आणि बहुमुखी आहे तसेच ती किती सशक्त आणि जिवंत आहे हे अत्यंत समर्पक शब्दात आणि प्रभावीपणे भारतीयांसमोर तसेच बिगर भारतीयांसमोर मांडण्याचे कार्य ते गेली कित्येक वर्षे करत आहेत.

प्रयोगसिद्ध कलांच्या समीक्षेचा उपद्व्याप करणाऱ्या व्यक्तीने नुसते लेखणीबहाद्दर असून चालत नाही. त्याला त्या कलेचा व्यवहार आतून माहीत असला पाहिजे, असे डॉ. रानड्यांचे मत आहे. 'बोले तैसा चाले' या न्यायाने त्यांनी संगीताची अत्यंत निष्ठापूर्वक उपासना केली आहे. लक्ष्मणराव गानू, प्रा. वा. र. देवधर आणि गजाननबुवा जोशी या गुरूंकडे त्यांनी कशी पद्धतशीर तालीम घेतली आहे याविषयी लोक ऐकून असतात. प्रत्यक्ष तालीम ऐकण्याचा योग रानडे सहसा येऊ देत नाहीत.

त्यांच्या शिष्यवर्गाने हा योग त्यांच्या षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्ताने घडवून आणला. गेल्या रविवारी "दादर माटुंगा कल्चरल सेंटर' या

## संगीत

सभागृहात अशोक रानडे शिष्यपरिवारातर्फे आनंद सोहळा आयोजित करण्यात आला होता. संगीत, नाट्य आणि साहित्य क्षेत्रातील रानडे यांच्या चाहत्यांनी या कार्यक्रमाला गर्दी केली होती. रानडेंचा सत्कार गुरू पार्वतीकुमार यांच्या हस्ते झाला आणि समारंभाचे अध्यक्षस्थान सतारवादक अरविंद परीख यांनी भूषवले होते. डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या शब्दात सांगायचे झाले तर, नवीन परिभाषा काटेकोरपणे तयार करणाऱ्या या समाजशास्त्रज्ञाचा गौरव करणारी यथोचित भाषणे याप्रसंगी झाली.

त्याचप्रमाणे रानडेंची संगीत संकल्पना लाभलेल्या बैठकीची लावणी, देवगाणी, राधा वगैरे अनेक उत्तमोत्तम कार्यक्रमांमधल्या रचना कलाकारांनी सादर केल्या.

डॉ. रानड्यांचे गायन हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण होते. त्यांनी 'विलासखानी तोडी' रागातील रूपक तालातील मध्यलयीची चीज गाऊन सुरुवात केली. बड्या ख्यालाने मैफल सुरू करण्याऐवजी मध्यलयीतल्या चीजेने सुरुवात करणे हे निव्वळ लहर किंवा अपघात नसून एक जाणीवपूर्वक घेतलेला निर्णय होता. केवळ 'सम' दाखवत बसण्याऐवजी अधूनमधून 'खाली' दाखवणेही आवश्यक असते, असे रानडे म्हणतात. त्या विचाराशी हे सुसंगत आहे. लयकारी, तान-फिक्का, बोलताना आणि अतिजलद जबड्याच्या ताना यांचा वापर करून त्यांनी 'विलासखानी' आणि 'जौनपुरी' रागातले ख्याल रंगवले.

रानड्यांनी गायलेल्या प्रत्येक रचनेला एक निराळी खुशबू होती. उदाहरणार्थ बिलावलमधील ठुमरीवजा रचना 'राधिकेचा रंग' ही बैठकीची लावणी तर नजाकतदार जागांनी ओतप्रोत भरली होती.

शेखर खांबेटे, चंद्रचूड वासुदेव, केदार बोडस, सुरेश बापट आणि पांडुरंग घोटकर यांच्या साथसंगतीने आनंदात भर टाकली.


■ अमरेंद्र धनेश्वर

# संगीताचार्य अशोक रानडे : खरे तर संगीत महर्षिच

एकसष्टाव्या वर्षात पदार्पण केलेले डॉ. अशोक दा. रानडे हे संगीतज्ञ म्हणून सर्वांना परिचित आहेत. संगीतज्ञ ही त्यांची ओळख रास्तही आहे पण पुरेशी नाही. मराठी व इंग्रजी साहित्यात एम्. ए. ची डिग्री, एल्. एल्. बी केलेले डॉ. रानडे. पं. गजाननबुवा जोशी, बी. आर. देवधर, गानू बोडस अशा मातब्बर ग्वाल्हेर गायकांकडे शास्त्रोक्त संगीत रीतसर शिकले आहेत.

ते निव्वळ हिंदुस्थानी संगीतशास्त्राचे अभ्यासक नाहीत तर लोकसंगीताचा त्यांचा अभ्यास आहे. संस्कृति संगीतशास्त्रावर काम करणारी भारतात जी मूठभर मंडळी आहेत, त्यापैकी ते अग्रणी आहेत. आवाज जोपासना शास्त्रावरची ती आज एक अधिकारी व्यक्ती आहे. गाणाऱ्यांबरोबरच रंगभूमीवरील व व्यासपीठावरील व्यक्तींना ते आवाजाचे व्यक्तीशः मार्गदर्शन करतात. शिबिरे घेतात. 'बैठकीची लावणी', 'राधा', 'देवगाणी' अशासारख्या वैशिष्टयपूर्ण कार्यक्रमांचे ते सूत्रधार, निरूपक व दिग्दर्शक आहेत हे बऱ्याच जणांना माहित असेल. पण **माता दौपद्री**, **देवाजीने करूणा केली**, **एक झुंज वाऱ्याशी इ.** दहा नाटकांना त्यांनी यशस्वीपणे संगीत दिले आहे हे फार थोडयांना ठाऊक असेल. तसेच मराठी, इंग्रजीबरोबर, बंगाली व रशियन भाषाही ते चांगल्या तऱ्हेने जाणतात. हा झाला त्यांच्या कामाचा थोडासा आढावा. प्रस्तुत लेखात त्यांच्या वैचारीक बाजूंचा संकल्पनांचा आढावा घेणे शक्य नाही. त्यांच्या साठीनिमित्त संक्षिप्त परिचय एवढाच उद्देश आहे.

गेली १०-११ वर्षे मी त्यांच्या संपर्कात आहे. संशोधन-सहाय्यक म्हणून ५ वर्षे N.C.P.A. त त्यांच्या हाताखाली काम करण्याची संधी मला मिळाली. डॉ. रानडे म्हटलं की डोळ्यासमोर येतं ते त्यांच शिस्तबद्ध आयुष्य. रोज पहाटे उठून तास-दोन तास आवाजाचा आणि गाण्याचा रियाझ. वाचनाला ठराविक वेळ, लिखाणाचा वेळ आखलेला. साधे सात्विक जेवण ते सुद्धा नियमित व सर्वसाधारण वेळांच्या बरेच लवकर. तसे मग मुद्दाम ठरवून पत्नीबरोबर (हेमांगिनीताई) आणि मित्र/आप्त/कुटुंबाबरोबर मुंबईतली अनेक उत्तमोत्तम हॉटेल्स त्यांनी पालथी घातली आहेत. त्या जेवणांत मग मासे व चिकनचाही समावेश असतो! पण हेमाताई म्हणतात, "तसं, तुझ्या सरांची खरी आवड म्हणजे गरम गरम वरण-भात आणि वर तुपाची धार!"



हेमाताई (मूळच्या हमीदा) आता आतापर्यंत आकाशवाणीच्या हिंदी विभागात मुलांची व महिलांची सदरे चालवत. डॉ. रानडयांची व त्यांची ओळख आकाशवाणीतलीच. (त्याला आता तीस वर्षे लोटून गेली) रानडे फार काळ आकाशवाणीत राहिले नाहीत. त्यांना मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागाचे प्रमुख म्हणून नोकरी मिळाली. भरपूर परिश्रम पडले. विविध कलाकारांचे कार्यक्रम, प्रात्यक्षिके, ध्वनीमुद्रणे आणि सुसूत्र अभ्यासक्रमाची रचना यांसहित संगीतपरविद्येचा कोर्स चालू राहिला. पुष्कळ विद्यार्थी येऊन शिकून गेले.

तिथून बाहेर पडून अर्काइव्हज् अँड रिसर्च सेंटर फॉर एथनोम्युझिकॉलॉजी (A.R.C.E) साठी ते पुण्याला वर्षभर काम करत होते. डेक्कन कॉलेजमध्ये त्यांचे ऑफिस होते.

पुढे फोर्ड फाउंडेशनच्या ग्रँटचा N.C.P.A. या संस्थे मार्फत विनियोग करायचे ठरले. पु.ल. देशपांडे यांच्या पाठिंब्यांनी सरांनी एथनोम्युझिकॉलॉजी-संबंधी एक व रंगभूमीविषयक दुसरा प्रकल्प उभा केला. थिएटर डेव्हलपमेंट सेंटरचे १९८४ सालपासून काम सुरू झाले. मराठी, हिंदी, गुजराथी व इंग्रजी नट व दिग्दर्शक नाटककार व इतर रंगकर्मींच्या मुलाखती, त्यांच्याकडली दुर्मिळ कागदपत्रे इ. जतन होऊ लागले. नेपथ्य, प्रकाशयोजना अशा अनेक विषयांवर अभिनव अशी शिबिरे, चर्चासत्रे आयोजित केली गेली. फॅक्टस अँड न्यूज व रंग-अंतरंग नावाच्या नियतकालिकांतून त्यातील रोचक माहिती प्रसिद्धी होऊ लागली.

एथनोम्युझिकॉलॉजीच्या प्रकल्पांतर्गत एकेक महिना कालावधी असलेली ३ शिबिरे,


# संगीताचार्य अशोक रानडे : खरे तर संगीत महर्षिच

त्यांना मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागाचे प्रमुख म्हणून नोकरी मिळाली. भरपूर परिश्रम पडले. विविध कलाकारांचे कार्यक्रम, प्रात्यक्षिके, ध्वनीमुद्रणे आणि सुसूत्र अभ्यासकाची रचना यांसहित संगीतपरविद्येचा कोर्स चालू राहिला. पुष्कळ विद्यार्थी येऊन शिकून गेले.

तिथून बाहेर पडून अर्काइव्हज अँड रिसर्च सेंटर फॉर एथनोम्युझिकॉलॉजी (A.R.C.E) साठी ते पुण्याला वर्षभर काम करत होते. डेक्कन कॉलेजमध्ये त्यांचे ऑफिस होते.

पुढे फोर्ड फाउंडेशनच्या ग्रँटचा N.C.P.A. या संस्थेमार्फत विनियोग करायचे ठरले. पु.ल. देशपांडे यांच्या पाठिंब्यांनी सरांनी एथनोम्युझिकॉलॉजी-संबंधी एक व रंगभूमीविषयक दुसरा प्रकल्प उभा केला. थिएटर डेव्हलपमेंट सेंटर १९८४ सालपासून काम सुरू झाले. मराठी, हिंदी, गुजराथी व इंग्रजी नट व दिग्दर्शक नाटककार व इतर रंगकर्मींच्या मुलाखती, त्यांच्याकडली दुर्मिळ कागदपत्रे इ. जतन होऊ लागले. नेपथ्य, प्रकाशयोजना अशा अनेक विषयांवर अभिनव अशी शिबिरे, चर्चासत्रे आयोजित केली गेली. फॅक्टस अँड न्यूज व रंग-अंतरंग नावाच्या नियतकालिकांतून त्यातील रोचक माहिती प्रसिद्धी होऊ लागली.

एथनोम्युझिकॉलॉजीच्या प्रकल्पांतर्गत एकेक महिना कालावधी असलेली ३ शिबिरे, ३ वर्ष मुंबई, बंगलोर व दिल्ली येथे घडवली गेली. या नव्या संकल्पनेची ओळख नव्या पिढीच्या संशोधकांना करून देण्यासाठी भारतीय अभ्यासकांबरोबरच परदेशी



तज्ञही बोलावले गेले. या कामामध्ये माझा थोडाफार सहभाग होता. प्रकर्षाने जाणवली ती व्यापक दृष्टी. एका विषयाला किती बाजूंनी भिडता येईल याचा वस्तुपाठच त्यातून मिळत होता. दुसरं म्हणजे नियोजनबद्ध काम. कुठेही विचारांचा गोंधळ नाही की कामात अपूर्णता नाही. या प्रकल्पांच्या आधारे कितीतरी नवीन विषयांवर- मूर्तीशास्त्र, दैवताशास्त्र, तसेच रंगभूमीशास्त्र, चरित्रे, लोकसंगीतावरील संशोधनात्मक ग्रंथ, नियतकालिके इ. N.C.P.A. च्या लायब्ररीत जमा झाली आहेत.

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आपल्याकडे गुणग्राहकता फार दुर्मिळ आहे. रानडयांनी N.C.P.A. तडकाफडकी सोडले! तशीच परिस्थिती निर्माण झाली.

वास्तविक ज्ञानी व्यक्ती ही माझ्याकडे या, मी तुम्हाला ज्ञान देईन असे कधीच सांगणार नाही. कारण माणूस जेवढा ज्ञानसंपृक्त होतो, तेवढा त्याचा नम्रपणा वाढतो. ज्ञानाच्या कक्षा किती अपार आणि अमर्याद आहेत याची त्याला जाणीव होते. संस्थेला मिळणारा हा ज्ञानाचा ओघ तिथेच थांबला!

सर एकदा गंमतीने म्हणाले, Music and ageing विषयावर अमेरिकेत सेमिनार होते. त्यासाठी त्यांना पेपर तयार करायचा होता. म्हणाले, "पार आयुर्वेद, योगशास्त्रापासून मी वाचायला सुरवात केली. मजा आली. तो लेख इतका चांगला झाला की तो फक्त परदेशातच वाचला गेला."

डॉ. रानडयांची ग्रंथसंपदा, त्याचे वैविध्य थक्क करणारे आहे. मराठी व इंग्रजी भाषेतल्या त्यांच्या पुस्तकांची नावेच पहा 'संगीताचे सौंदर्यशास्त्र,' 'ऑन म्युझिक अँड म्युझिशियन्स ऑफ हिंदुस्थान,' 'लोकसंगीतशास्त्र,' 'इंडॉलॉजी अँड एथनोम्युझिकॉलॉजी,' 'स्टेज म्युझिक ऑफ महाराष्ट्र' अशी अनेक पुस्तके, लेख, कोशांमधील टिपा त्यांच्या नावावर जमा आहेत. आता हिंदी चित्रपट संगीताविषयी त्यांचे पुस्तक निघत आहे.

रानडे सरांची साठी उलटली आहे ती केवळ कॅलेंडर दाखवत आहे म्हणून बाकी व्यक्तिमत्व टवटवीत, वागण्यात चटपटीतपणा, बोलण्यात खेळकर व मिस्किल भाव कायम असतो.

त्यांच्या घरी येणाऱ्या प्रत्येकाला या जोडप्याकडून जो आपलेपणाचा व आस्थेचा अनुभव येतो तो परत परत घ्यावासा वाटतो. 'त्यांना भेटून आलं की खूप छान व शांत वाटायला होतं.' असं त्यांची एक शिष्या म्हणाली. प्रत्येकाचे याबाबतीत एकमत असेल याची मला खात्री आहे. हेमाताईंच सध्या हिंदी कादंबऱ्याचं लिखाण चालू असतं. सरांच्या जेवणाखाण्याच्या वेळा व देशा-परदेशी वगैरे दौरे सांभाळून (ज्यात त्या स्वतः ही बऱ्याचदा सहभागी होतात) लिखाण व इतर पत्रव्यवहार चालू असतो. जनसंपर्क खातं ही त्यांच्याकडेच सोपवले आहे!

डॉ. रानडे मग एरवी त्यांच्या पर्सनल कॉम्प्युटरमध्ये गुंतलेले असतात. संगीत, नाटय, इतिहास, पुराणं अशा अनेक विषयांवरील शेकडो नोंदी व त्यांचे क्रॉस रेफरन्सिंग (परस्पर संदर्भ) त्यांनी कार्डावर गेली कित्येक वर्षे उतरवून ठेवले आहे. ते त्यांच्या डेटा बेसवर उतरवण्याचे काम व इतर लिखाण कॉम्प्युटरवर चालू असते. 'कॉम्प्युटरमुळे एकाच वेळी घडलेल्या जगभरातील सर्व घटना मला समोर एकत्र मिळतात- juxtaposition, आणि मग थक्क करायला लावणारे सूत्र मिळत जाते' असे कौतुकोद्गार त्यांच्याकडून निघत असतात.

**वर्षा जोगळेकर**




# 'नाट्यदर्पण' रजनीची चाहूल

❖ सुधाकर नातू ❖

आचार्य अत्रे ही एक असामान्य व्यक्ति, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रावर आपला अद्भूत ठसा उमटवून गेली. चाकोरीबद्ध, क्लिष्ट अशा पाठ्यपुस्तकांच्या ओझ्यांमधून, नवविचारप्रणाली, नव्या दिशा अगदी सुलभ, सोप्या भाषेत आचार्यांनी आपल्या अरुण/नवयुग वाचनमाला ह्या पाठ्यपुस्तकांद्वारे बाळगोपाळांचे जाणीव विश्व अधिक सजग, चौकस व समृद्ध केले. लंडनची टी.डी.मिळविलेला हा बुद्धिमान व धडाडीचा शिक्षक पुढे रंगभूमी, चित्रपट लेखन साहित्य, पत्रकारिता आणि राजकारण ह्यासारख्या विविधक्षेत्रात न भूतो, न भविष्यति असे क्रांतिकारक कार्य करुन गेला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा मंगलकलश आणण्यामागे आचार्य अत्र्यांची धडाडी, जोश, अमोघ वक्तृत्व आणि तळमळीने सर्वस्व ओतून केलेले कष्ट, लेखणीचे वादातीत सामर्थ्य ह्यांचा सिंहाचा वाटा होता. आचार्यांच्याच 'अतिरेकी' भाषेत त्यांचेच वर्णन करायचे झाले तर असा माणूस गेल्या दहा हजार वर्षात झाला नाही व पुढेही कधी होणार नाही. अशा ह्या थोर माणसाच्या जन्मशताब्दिचे हे वर्ष. विविध संस्था, विविध प्रकारे आचार्यांच्या स्मृतिला वंदन करत आहेत.

'नाट्यदर्पण प्रतिष्ठान' सारख्या प्रतिष्ठित मान्यवर संस्थेने, मुंबईच्या नेहरु सेंटरच्या सहकार्याने आचार्य अत्र्यांच्या जन्मशताब्दिचे मर्म अभिनव पद्धतीने रसिकांपुढे सादर केले. दरवर्षी 'कल्पना एक व आविष्कार अनेक' ह्या उपक्रमाद्वारे गेले दशक/दीड दशक नाट्यदर्पण – नेहरु सेंटर सहयोग एकांकिका स्पर्धांचे यशस्वी आयोजन करत आला आहे. मराठी माणसाच्या नाटकासारख्या जिव्हाळ्याच्या विषयाला सातत्याने खतपाणी घालण्याचे उपयुक्त कार्य ही मंडळी अत्यंत प्रामाणिकपणे, नीटनेटकेपणाने पार पाडत आली आहेत. श्री. व सौ.सुधीर दामले ह्या कष्टाळू प्रसिद्धीपराङ्मुख दांपत्याचा प्राण व श्वास असलेले नाट्यदर्पणचे हे कार्यकर्तृत्व खरोखर 'ऑल द बेस्ट!' सध्या रंगभूमीवर विक्रमाची पताका फडकावणारे 'ऑल द बेस्ट' हे नाटक कल्पना एक... मधील एकांकिकेचेच विस्तारीत रुप.

मराठी रंगभूमीवर अजरामर होऊन राहिलेल्या आचार्य अत्र्यांच्या नाटकावर बेतलेल्या एकांकिकांची स्पर्धा ह्या वर्षी नाट्यदर्पण-नेहरु सेंटर सहयोगाने आयोजित केली होती. एकाच दिवशी आचार्यांची गाजलेली आठ नाटके नवीन ताज्या दमाच्या तरुण कलाकारांच्या आविष्कारातून पहायला मिळणे हा एक आनंददायी व प्रसन्न अनुभव होता. नेहरु सेंटरचे आलिशान व सुसज्ज नाट्यगृह हे मुंबईतील 'द बेस्ट' असे सभागार. तिथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपूर्ण दिवसभर नाट्यास्वाद घेणे ह्यासारखा नाट्य रसिकांना दुसरा कुठलाही आनंद नाही. आम्ही हा समाधानाचा जल्लोष दामलेसाहेबांच्या प्रेमळ सौजन्याने नेहमीच अनुभवत आलो आहोत. रंगभूमीला उद्याचे महान कलाकार देणारा हा असा उपक्रम. ह्या एकांकिका स्पर्धेचे परिक्षक श्री. दाजी भाटवडेकर, श्री. कुमार सोहोनी आणि आचार्यांच्या सुकन्या श्रीमती शिरीष पै हे होते. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री.प्रमोद नवलकर, नाट्यदर्पण प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर आणि प्रमुख पाहुणे 'तो मी नव्हेच' फेम श्री प्रभाकरपंत पणशीकर ह्यांच्या उपस्थितीत हा सुखसोहळा थाटामाटात पार पडला.

मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात काळाच्या पुढे जाऊन विचार करायला लावणारी, तसेच हलकीफुलकी विनोदप्रधान आणि खेळकर तसेच समस्याप्रधान अनेक नाटके आचार्य अत्र्यांच्या प्रतिभासंपन्न लेखणीतून अवतरली. तो रोमहर्षक इतिहासच ह्या नाट्यजल्लोषामुळे पुनश्च सजीव झाला.

पुरुषाचा स्खलनशील, स्त्रीलंपट, स्वभाव परिणामकारकपणे व्यक्त करणारे 'लग्नाची बेडी', कल्पनातीत स्वार्थी व चिक्कू स्वभावाचे विडंबन करणारे 'कवडीचुंबक' स्त्रीची असहाय्य व अगतिक अवस्था व्यक्त करत, तिला पुरुषाच्या बरोबरीने हक्कांची जाणीव करुन देणारे 'घराबाहेर' उगाचच समाजाचा बाऊ करुन आपल्याला बंदिस्त करुन घेण्याच्या माणसाच्या नाकर्तेपणावर अंजन घालणारे 'जग काय म्हणेल', विवाहासारख्या जिव्हाळ्याच्या विषयाचा हलकाफुलका पदर दर्शविणारे 'पाणिग्रहण' आणि ह्याच विषयाची एक शोकमय सामाजिक समस्या निर्माण करणाऱ्या दुष्टप्रवृत्तीचे 'तो मी नव्हेच', निवडणुकांच्या आजच्या जमान्यातही शोभावे असे 'मी उभा आहे' आणि भोंदूगिरीचा बुरखा फाडणारे उत्तम विडंबन 'ब्रह्मचारी' अशी आचार्यांची आठ नाटके ह्या स्पर्धेत एकांकिका स्पर्धेत समर्थपणे सादर झाली. रंगभूमीवरील विविधअंगी आविष्कारासाठी अनेक पारितोषिके संबंधित विजेत्यांना देण्यात आली. ह्या साऱ्या नाट्यमय सोहळ्याला तशीच नाट्यमय फोडणी देत, प्रत्यक्ष आचार्य अत्र्यांचे धडाकेबाज व्यक्तिमत्वाचे 'प्रत्यक्ष' जितेजागते दर्शन श्री.सदानंद जोशी ह्यांनी त्यानिमित्ताने छोटेखानी एकपात्री कार्यक्रमाद्वारे उभे केले. सकाळी १० पासून रात्रीपर्यंत सुमारे बारा तास आचार्य अत्र्यांच्या कर्तृत्व सहवासात कसे गेले ते कळलेच नाही.

'नाट्यदर्पण प्रतिष्ठान' तर्फे मराठी रंगभूमीवरील वर्षभरातील कामगिरीची दखल विविध मानचिन्हे व पारितोषकांद्वारे नाट्यदर्पण रजनीद्वारे घेतली जाते. 'ऑस्कर' फिल्मफेअर ॲवार्डसच्या धर्तीवर आयोजित होणारा हा कौतुकसोहळा ही मराठी रसिकाच्या जीवनातील एक अपूर्व संधी असते. संभाव्य विजेत्यांची यादी ह्या पारितोषकांच्या निमित्ताने संबंधित परिक्षकांच्या सहाय्याने 'नाट्यदर्पण' तर्फे



'नाट्यदर्पण प्रतिष्ठान सोहळ्यात नेहरू सेंटरचे सांस्कृतिक कार्यक्रमप्रमुख श्री.काझी यांचा सत्कार करताना श्री.पुरुषोत्तम दारव्हेकर

शिक्षा व्हायची वेळ दुर्दैवाने आली आहे. टेलिव्हिजन कार्यक्रमात स्टेजवरील मंडळीसाठी जसा 'मॉनिटर' असतो तसाच भाषणाच्या कार्यक्रमात व्यासपीठावरील मंडळीना बोलणे नीट ऐकू येण्यासाठी काही तांत्रिक सोय केली जावी ही बाबूजींची सूचनाही अमलात यावी अशीच आहे. बाबूजींच्या जीवनातील मास्तरांच्या आठवणीचे प्रसंग ह्या दोघांच्या श्रेष्ठत्वाचे आरसे होते. श्री.बाळ सामंताचे त्यांना अभ्यासपूर्ण, परंतु सामान्य रसिकांना उगाचच अघळपघळ, पाल्हाळिक वाटणारे भाषण वगळता साराच सोहळा हृद्य व संस्मरणीय होता. प्रेक्षकांत पन्नाशीच्या आतला माणूस अभावानेच होता हीदेखील एक खटकणारी बाब. 'जन पळभर म्हणतील हाय हाय' हे खरे ठरविणारी!

**● चवदार शास्त्रीय संगीताचा गौरव !**

'आवाजाची दुनिया' माणसाच्या व्यथित मनाला शांत समाधानी आणि प्रसन्न करण्यास निश्चित हातभार लावू शकते. मात्र त्याकरता शब्द, स्वर, सूर, ताल आणि लय ह्यांचे माधुर्यपूर्ण मिश्रण मात्र व्हायला हवे. आपल्या गद्य आविष्कारातही असे हवेहवेसे वाटणारे गतिमान, गोड-मधाळ मिश्रण असणाऱ्या डॉ. अशोक रानड्यांसारखा संगीताच्या विश्वातला कलंदर विरळाच. बहुश: दूरदर्शनवरील सांगितिक चर्चा, मुलाखतीवजा कार्यक्रमांतून बहारदार सूत्रसंचालन करणारा माणूस म्हणून आम्ही नेहमी रानडेसाहेबांना छोट्या पडद्यावर आवर्जून पाहत आलो.

डॉ. रानड्यांच्या षष्ठ्यब्दिपूर्ती निमित्तच्या संगीतमय, सहकार-कौतुक सोहळ्याला हजर रहायचा अवचित योग आला. 'तेच' दादर माटुंगा कल्चरल सेंटरचे 'प्राचीन गुहेत' रियाज चालू आहे असे वाटणारे सभागृह, ठेवणीतले, मंगलकार्यासाठी राखून ठेवलेले कपडे ल्यालेल्या तरुण-मध्यमवयीन स्त्री पुरुषांनी अक्षरश: ओसंडून गेले होते. संगीताच्या *माध्यमातून जीवनाच्या विविध क्षेत्रात चांगले* कर्तृत्व गाजविणारे रसिकजन एकत्र आले होते. एका साठी उलटू पाहणाऱ्या 'तरुण' मनाच्या 'सरदारा'ला मुजरा करायला !

गंमत अशी की व्यासपीठावर उत्सवमूर्ती डॉ. अशोक रानडे स्वत:च नादब्रह्मात साऱ्यांना घेऊन जाण्यास तत्परतेने तयार होते. एक उत्तम गायक आणि एक विद्वान संगीत संशोधक प्राध्यापक असलेल्या ह्या गुणी माणसाने आपल्या अद्भुत अदाकारीने आम्हाला त्यादिवशी 'शास्त्रीय संगीता'च्या अनोख्या प्रांगणात मनमुराद खेळवले.

माणसाचे शरीर गोटीबंद, आरोग्यसंपन्न राखण्यासाठी जशी सूत्रबद्ध कसरतीची, व्यायामाची गरज असते, भाषेचा आब आणि थाट विशिष्ट चौकटीत बंदिस्त करण्यासाठी व्याकरणाची गरज असते. त्याचप्रमाणे शास्त्रीय संगीत-हा स्वर व सूरांच्या दुनियेतला पायाभूत व्याकरणाच्या कसरतीचा धडा आहे. हेच आम्हाला अशोकजींच्या प्रसन्न, सुरेल सुरांनी पटवून दिले. भावगीतांपासूनच्या इतर सर्वच सर्व तऱ्हेच्या संगीताची पहिली पायरी म्हणजे शास्त्रीय संगीत का असते त्याचीही अर्थपूर्ण जाणीव आम्हाला ह्या आनंददायी सत्कार सोहळ्याने करून दिली.

❀❀❀


**सुधाकर नातू**
4/19 सागर सोसायटी,
रहेजा हॉस्पिटलजवळ,
माहिम, मुंबई - १६


To
डॉ. अशोकजी रानडे
मुंबई ९१

स.न.वि.वि.
'साहित्य' मार्च ९८ अंकातील माझा 'रंग संगत' हा लेख तुम्हाला पाठवत आहे. तुमच्या षष्ठ्यब्दिपूर्ति सोहळ्याची काही क्षणचित्रे त्यात आलेत

कळा
सुधाकर नातू
Phone 4456871